**नि. फौ. खटला क्र.११३/२०२२**

**निशाणी क्र.७७**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०२ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

**माझे नांव** : गौतम मारोती कांबळे,

**वय** : ५२ वर्षे, **धंदा** : मजुरी,

**राहणार** : येणकी, ता. उदगीर, जि. लातूर.

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. कुलकर्णी यांचेमार्फत ::**

दयानंद कांबळे हा माझा भाऊ आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. ते माझ्या गावातील रहिवासी आहेत. दोन वर्षापूर्वी शेतामध्ये रात्री ८.३० ते १०.०० वाजताच्या दरम्यान घटना घडली होती. त्यावेळी दयानंद हा शेतामध्ये नांगरणी करण्यासाठी गेला होता. त्यावेळी आरोपी माणिकप्रभू, सुकुमार व काही अज्ञात ईसम असे मिळून दयानंदला मारण्यासाठी तेथे गेले होते. दयानंद कसाबसा सुटून घरी आला. सदर लोकांनी दयानंदला मारले आणि त्याच्या खिशातील पैसे काढून घेतले, याबाबत दयानंदने मला सांगितले होते. दयानंदला उलटी झाली होती. त्यामुळे बिरबल व हरीबा भंडेचा मुलगा यांनी दयानंदला उदगीर येथील सरकारी दवाखान्यामध्ये नेले होते.

०२. त्यानंतर रात्री माझा भाऊ विजयकुमार मारोती कांबळे, आई कमळाबाई, बहीण सुवर्णा हे माझ्या घरी आले आणि आरडाओरड करून तू घरात झोपलास, माणसे शेतात मारायला गेली असे म्हटले. राजाबाई गोविंद कांबळे, गोविंद बाबू कांबळे, सुकुमार गोविंद कांबळे, तुळशिराम गोविंद कांबळे, नारायण पुंडा शिंदे, गुंडू पुंडा शिंदे, माणिकप्रभू भुताळे, गोविंद भुताळे, वच्छलाबाई नारायण शिंदे, रुक्मीनबाई विठ्ठल शिंदे हे माझ्या घरी आले होते आणि ''तू बाहेर ये, तुझे कापून तुकडे करून पोत्यात बांधून बाजूच्या तळ्यात टाकतो, पोलीस स्टेशन किंवा कोर्ट काही करत नाही, तुझी फिल्डिंग लावली, आमचे कोणी वाकडे करत नाही, आम्ही असाच शेतावर कब्जा केला'', असे म्हणून दम दिला. त्यानंतर सदर लोक तेथून निघून गेले. दयानंदने दुसऱ्या दिवशी सदर घटनेबाबत पोलीस ठाण्यामध्ये खबर दिली होती. सदर ईसमांपैकी काही लोक आज हजर आहेत व काही

लोक गैरहजर आहेत. (अर्ज निशाणी ७६ वरील आदेशाप्रमाणे आरोपी क्र.५ व १० यांची गैरहजेरी माफ केलेली आहे.)

**:: <u>आरोपी क्र.२ ते ६ व ८ ते १३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एन.एल. मध्वरे यांच्यामार्फत</u> ::**

०३. माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि दयानंदचे येणकी गावामध्ये वेगवेगळी घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरापासून सर्वे नं.९६ दूर अंतरावर आहे. मी आणि दयानंद १० ते १५ वर्षापासून वेगवेगळे राहतो. मी नमूद दिवशी माझ्या घरी होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर दिवशी शेतात गेलो नव्हतो आणि नमूद शेतातील घटना माझ्या समक्ष झालेली नाही.

०४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ ते ६, ८ ते १३ आणि दयानंद यांच्यामध्ये उदगीर न्यायालयात दिवाणी दावा सुरू आहे व सदर दाव्यामध्ये आमचा मनाईहुकूमाचा अर्ज नामंजूर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय अधिकारी, उदगीर, जिल्हाधिकारी लातूर आणि आयुक्त औरंगाबाद येथील प्रकरणांमध्ये माझ्याविरुध्द निकाल झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरुध्द सर्व निकाल गेल्याने मी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, जमिनीचा वाद मिटविण्यासाठी आणि केसेस काढून घेण्यासाठी मी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी राजाबाई, वच्छलाबाई व रुक्मीनबाई ह्या वयोवृध्द आहेत व त्यांना चालता येत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, राजाबाई, वच्छलाबाई व रुक्मीनबाई ह्या वयोवृध्द आहेत. हे मला माहीत नाही की, बऱ्याच वर्षापूर्वी वच्छलाबाईच्या कमरेची शस्त्रक्रिया झाली. हे म्हणणे खरे नाही की, वच्छलाबाईला उठता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दाव्यामध्ये मी सुध्दा वादी आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दयानंदला मदत करण्यासाठी आरोपींविरुध्द खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

**:: <u>आरोपी क्र.१, ९, १४ व १५ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार</u>**

**यांच्यामार्फत ::**

०५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गोविंद आणि सावित्राबाई हे जन्मापासून अपंग आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गोविंद आणि सावित्राबाई हे नमूद घटनेच्या पूर्वीपासून अपंग आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांना चालता–फिरता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माणिकप्रभूला बेंबीचा त्रास आहे व त्यामुळे तो नेहमी घरीच झोपून राहतो. जळबा भुताळे हे माणिकप्रभू आणि गोविंदचे वडील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यांची सर्वे क्र.४९/३ मध्ये ० हे. ९२ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन हडपण्यासाठी आरोपींविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींना मारहाण केली आणि दयानंदला पुढे करून खोटी खबर दिली. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबाबत माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दयानंदने सांगितल्याप्रमाणे मी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत | सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.

दि.०४/०२/२०२६.